आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्रमांक.५४

# समजपूर्वक वाचन क्षमतेचा विकास करण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका
# The Role of School Leadership in Developing Reading Comprehension





## प्रस्तावना -

प्राथमिक शिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया होय. प्राथमिक शिक्षण दर्जेदार, गुणवत्तापूर्ण मिळाले तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. शालेय शिक्षण जितके आनंददायी, कृतियुक्त असेल तितकी शिक्षणाची गोडी विद्यार्थ्यांमध्ये वाढत जाते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन २०२० नुसार, प्राथमिक स्तरावर सन २०२६ - २७ पर्यंत मुलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. यात प्राथमिक पातळीवरील अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त केली नाही, असे ठळकपणे नमूद आहे. वय वर्षे ३ ते ९ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी त्वरीत एक राष्ट्रीय अभियान राबवून त्याची राज्यामध्ये अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, असे सांगितले आहे. सदर अभियानात विद्यार्थी, पालक, शाळा, शिक्षक व समाज या सर्वांनी सर्वंकष पुढाकार घेऊन राज्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणाचा पाया मजबूत करणे गरजेचे आहे. यासाठीच भारत सरकारने **"निपुण भारत अभियान"** सुरु केले आहे. यामध्ये भाषिक कौशल्ये विकसित करण्यासाठी पुढील प्रमाणे पायाभूत साक्षरतेचे घटक निश्चित करण्यात आलेले आहे.




- **मौखिक भाषा विकास :-** लेखन व वाचनाची कौशल्ये विकसित करण्यासाठी मौखिक भाषेचा विकास महत्त्वाचा आहे.
- **उच्चार शास्त्राची जाणीव :-** शब्दांची लय व ध्वनीची जाणीव या बाबींचा योग्य वापर होणे गरजेचे आहे.
- **सांकेतिक भाषा / लिपी समजून घेणे :-** यामध्ये छापील मजकुरांचे आकलन करण्याची क्षमता, अक्षरांचे ज्ञान, सांकेतिक भाषा, लिपी समजून घेणे, शब्द ओळखणे.
- **शब्द संग्रह :-** मौखिक शब्द संग्रह, वाचन / लेखन शब्दसंग्रह व शब्दांच्या विविध अर्थछटा.

- **वाचन व आकलन :-** मजकूरावे वाचन करून अर्थ समजून घेणे, माहिती प्राप्त करणे व मजकुराचे स्पष्टीकरण करणे.
- **वाचनातील ओघवतेपणा :-** मजकूर अचूकपणे व लयबद्ध वाचणे, अभिव्यक्ती व आकलन.
- **लेखन :-** अक्षरे व शब्द लिहिणे, अभिव्यक्तीसाठी लिहिणे याची क्षमता.
- **आकलन :-** छापील मजकूर / पुस्तके यामुळे आकलन कौशल्ये विकसित होण्यास मदत.
- **वाचन संस्कृती / वाचनाकडे कल :-** यामध्ये विविध तऱ्हेची पुस्तके व इतर वाचन साहित्य वाचण्याकडे कल असणे.

शालेय जीवनात प्राथमिक स्तरावर मुलांच्या भाषा विकासास सहजपणे सुरुवात होते, भाषा अवगत करणे ही एक दैनंदिन प्रक्रिया असते. मुले दैनंदिन जीवनात त्यांच्या नकळतही भाषेचे अध्ययन करत असतात. ते दैनंदिन जीवनातील संवादात एकाच वेळी विविध भाषांचा वापर करत असतात. आपल्यापेक्षा मोठ्यांना, वडीलधाऱ्यांना, शिक्षकांना बोलताना कोणते संबोधन वापरायचे हे देखील त्यांना माहीत असते. मुले घरातील किंवा आकाशवाणीवरील संभाषण ऐकत असतात, दूरदर्शन वरील कार्यक्रम ऐकत व पाहत असतात. या विविध कार्यक्रमांतून त्यांना भाषेचा परिचय होत असतो. व त्यातून त्यांची आकलन पातळीचा विकास होत असतो.

विविध स्रोतांच्या माध्यमातून मुले स्वतःची भाषा तयार करतात आणि ती भाषा बऱ्याच वेळेस संवादासाठी ते वापरत असतात. मुलांच्या आजूबाजूच्या परिसरात, घरामध्ये भरपूर लिखित साहित्य उपलब्ध असते. उदाहरणार्थ: घरावरील नावाची पाटी, दिनदर्शिका, भांड्यांवर कोरलेले कुटुंब प्रमुखाचे नाव यांसारख्या बाबींचा सुद्धा वापर ते करत असतात. या सर्व बाबींमुळेच शाळेत येण्यापूर्वीच मुलांची वाचन आणि लेखनाची एक समज विकसित झालेली असते. मुलांचे हे पूर्वज्ञान असून त्यांच्या भाषा साक्षरतेचे कौशल्य विकसित करण्यासाठीचा एक पाया मानला जाऊ शकतो.

**वाचन व आकलन :-** मजकूरावे वाचन करून अर्थ समजून घेणे, माहिती प्राप्त करणे व मजकुराचे स्पष्टीकरण करणे.

आकलनात्मक वाचनास समजपूर्वक वाचन असेही म्हणता येईल. यामध्ये मजकुरातील माहिती समजून घेणे, मजकुरातून अर्थ काढणे आणि त्याबद्दल चिकित्सकपणे विचार करणे या बाबी समाविष्ट आहेत. आकलनात्मक वाचनात मुले मजकूर समजून घेऊ शकतात. आकलनयुक्त वाचन संकल्पनेत विस्तार करणे, उदाहरण देणे, तर्क करणे, अनुमान काढणे, अंदाज लावणे, वाचलेल्या मजकुरातून सारांश काढणे यांसारख्या बाबी समाविष्ट होतात. वाचन ही अर्थ निर्माण करण्याची प्रक्रिया असून आकलनयुक्त वाचन हा वाचनाचा अविभाज्य भाग आहे. वाचनाच्या प्रक्रियेत अनेक बाबी समाविष्ट असतात.

जसे वाचत करीत असताना मुले पुढे कोणता शब्द येईल अथवा कोणते वाक्य येऊ शकते याबाबत अंदाज बांधू शकतात. आकलनामध्ये मुले चित्र आणि आणि मजकुराचा आशय समजून घेण्याचा प्रयत्न करतात. मुले वाचन करताना कधी कधी  स्व-सुधारणाही करतात; म्हणजेच या बाबीमध्ये मुले एखादा मजकुर पुन्हा-पुन्हा वाचण्याचा प्रयत्न करतात. तसेच काही वेळेस स्वतःचे उच्चारही सुधारण्याचा प्रयत्न करतात.

**मोडयूलची उद्दिष्टे :-**

१) उतारा  वाचन उपक्रमाचे महत्व समजून घेणे.

२) उतारा वाचन उपक्रमातील शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.

३) उतारा वाचन उपक्रमाचा अध्ययन प्रक्रियेत उपयोग करण्याबाबत शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करणे.

**उतारा वाचन :-**

आकलनासह केलेले ध्वनी उच्चारण म्हणजे वाचन. वाचनामुळे मानवाच्या व्यक्तिमत्वाचा अंतर्बाह्य विकास होतो. वाचन आकलन म्हणजे मजकूर वाचण्याची, त्यावर प्रक्रिया करण्याची आणि त्याचा अर्थ समजून घेण्याची क्षमता हे एकमेकांशी जोडलेल्या क्षमतांवर अवलंबून आहे.

वाचन करीत असताना लिहिलेले डोळ्यांतून ओळखणे एवढेच आपल्याला अभिप्रेत नसते... मजकुराचा अर्थ कळणे महत्त्वाचे असते...

वाचन म्हणजे लिहीणाऱ्याच्या हेतूनुसार वाचणाऱ्याच्या तयारीप्रमाणे होणारे अर्थाचे आकलन होय... वाचनातून आकलनाबरोबर उद्दिष्टांनुरूप कृतीची प्रेरणा होते... लिहिणाऱ्याचा आवाज, भूमिका, व्यक्तिमत्त्वही कळते...

अर्थपूर्ण वाचन होण्यासाठी ते आकलनासह होणे गरजेचे आहे. एखादा पाठ समजून घेताना त्यात आलेले शब्द, म्हणी, वाक्प्रचार, भाषेचे सौंदर्य, व्याकरण, पाठाखालील स्वाध्याय, शब्दांचे भावार्थ अशा कितीतरी बाबी योग्य रीतीने समजणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सुरुवातीला जर छोटे - छोटे उतारे देऊन विद्यार्थ्यांचा सराव घेतला तर नक्कीच विद्यार्थ्यांच्या मनात वाचनाची भिती राहणार नाही. या उताऱ्यात सर्व  आवश्यक बाबींचा समावेश करून आकलनासहीत उतारे वाचन विद्यार्थ्यासाठी  गरजेचे आहे.

**वाचन व समजपूर्वक वाचन :-**

वाचन व समजपूर्वक वाचन यात फरक आहे. वाचता येणे म्हणजे समजपूर्वक वाचन हा अनेकांचा समज आहे. अक्षर ,शब्द ओळखता आले म्हणजे वाचन म्हणावे का ? लिहिलेले मजकूराचा अर्थ जाणून घेण्याची प्रक्रिया म्हणजे वाचन होय. यात विरामचिन्ह ओळखून मजकूर वाचता येणे आवश्यक आहे.

- लिहिलेल्या व छापलेल्या मजकूराबद्दल समजपूर्वक अर्थ लावणे व स्वतःचे मत व्यक्त करणे.
- योग्य गती, आरोह-अवरोह व योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाचन करणे व त्यातील आशय समजणे.
- भाषेत विविध साहित्य प्रकार असतात, त्यातील आशय समजणे, त्यावर चर्चा करणे, विविध मजकुरावर मत व्यक्त करणे, प्रतिक्रिया देणे, त्याचबरोबर प्रश्न विचारणे, यासारख्या क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणे अपेक्षित आहे.

प्रत्येक मूल शिकते व्हावे यासाठी आपण प्रयत्न करत आहोत. मुलांची वाचन, लेखन क्षमता आणि इतरही मुलभूत क्षमता सक्षमतेने विकसित होणे गरजेचे आहे. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणाचा विचार करता समजपूर्वक वाचन या अध्ययन निष्पत्तीचे महत्व स्पष्ट होते. यामध्ये आपला निकाल वाढवणे गरजेचे आहे. अर्थपूर्ण वाचनाशिवाय मुलांना शिकण्याबाबतची अनास्था निर्माण होते व यामुळे मुलांना सर्व विषयात गतीपूर्ण शिकण्यात अडचणी निर्माण होतात यावरून अर्थपूर्ण वाचनाचे अनन्यसाधारण महत्व लक्षात येते.

भाषा साध्य करण्याचे, संवादाचे, माहिती आणि कल्पना व्यक्त करण्याचे, वाचन हे एक साधन आहे. भाषा कोणतीही असू द्या; वाचकाचे पूर्वज्ञान, अनुभव, वृत्ती आणि तो ज्या भाषिक समुहाचा घटक आहे त्या समुहाची सांस्कृतिक आणि सामाजिक वळण या प्रभावांनी घडलेला वाचक आणि तो वाचत असलेला मजकुर यांची परस्परांवर पडणारे अथवा न पडणारे प्रभाव यांची प्रक्रिया गुंतागुंतीची असते म्हणूनच वाचनप्रक्रियेच्या प्रयोगात, विकासात आणि सुधारणेत सातत्य हवे.

शिक्षण प्रक्रियेतील शिक्षक व विद्यार्थी हे महत्त्वाचे अंग आहेत.शिक्षक हा शिक्षण प्रणालीचा कणा तर विद्यार्थी हा आत्मा आहे. म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेमध्ये नेहमीच विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना श्रवण, भाषण, वाचन व लेखन ही कौशल्ये आत्मसात होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ही कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावीत यासाठी उतारा वाचन उपक्रम अतिशय सहज व सोप्या पद्धतीने अहमदनगर जिल्ह्यात राबविण्यात आला असून या उपक्रमाचा विद्यार्थ्यांना निश्चितपणे उपयोग झाला.

भाषिक कौशल्ये विकसित करत असताना उतारा व त्यावरील प्रश्न सोडवणे किंवा पाठाखाली दिलेली प्रश्नोत्तरे सोडवताना मुलांना अडचणी येत होत्या. वर्गातील विद्यार्थी उतारावाचन व त्याखाली येणाऱ्या प्रश्नांचे उत्तरे लिहिताना चुका करत होती. एकतर मुले उतारा लक्षपूर्वक वाचत नव्हती. लक्षपूर्वक न वाचल्याने त्यांना प्रश्नांचा नीटसा अर्थ कळत नव्हता. त्यामुळे उत्तरे लिहिताना खूप वेळा मुले पुन्हा प्रश्नच लिहून काढायची किंवा उत्तरे चुकीची लिहिलेली असायची. तसेच उतारा समजपूर्वक वाचत नव्हती ही बाब लक्षात आल्यानंतर मुलांना सहज सोप्या रीतीने उतारावाचनाच्या माध्यमातून विविध प्रश्नप्रकार हाताळता कसे येतील याचा विचार करण्यात आला. त्या दृष्टीने प्रयत्न करुन कमीत कमी ओळींचा उतारा देऊन त्यावर प्रश्न काढण्यात आले. मुलांनी कोणत्याही गोष्टींचे समजपूर्वक वाचन करावे यासाठी उतारावाचन हा उपक्रम महत्वपूर्ण आहे. मुलांनी पाठ्यपुस्तक किंवा इतर अवांतर गोष्टींचे समजपूर्वक वाचन केले तर ते त्या पाठाच्या आशयाचे सखोल ज्ञानार्जन करु शकतील. भाषेचे रसग्रहण करु शकतील.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकांची व मुख्याध्यापकांची भूमिका अत्यंत महत्वाची असते. विविध शालेय व सहशालेय उपक्रमांमधून कोणते उपक्रम आपल्या विद्यार्थी, वर्ग व शाळेसाठी महत्वपूर्ण आहेत याची माहिती शिक्षक व मुख्याध्यापकांना असते, त्या दृष्टीने ते नवनवीन उपक्रमांचे आयोजन करीत असतात.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. अशा उपक्रमांना आणि शाळांना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील सर्व अधिकारी हे भेटी देत असतात. जिल्हास्तरावर नवोपक्रम स्पर्धेच्या माध्यमातून उतारा वाचन उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेचा विकास या उपक्रमाबाबत माहिती संकलित करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतेच्या विकासासाठी सदर उपक्रम महत्वपूर्ण वाटला त्या दृष्टीने सदर उपक्रमाची शिक्षकांकडून संपूर्ण माहिती घेऊन शाळा भेटी केल्या. सदर उपक्रमातून विद्यार्थ्यांना होणारा फायदा व शालेय नेतृत्वाचे कार्य सर्वांसमोर आणावे या हेतूने सदर मोड्यूल विकसित करण्यात आले.

उतारा वाचन उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेचा विकास हा उपक्रम श्रीम.सुनिता भाऊसाहेब इंगळे, प्राथमिक शिक्षक, नगरपालिका शाळा क्र.६ कोपरगाव ता.कोपरगाव जि.अहमदनगर यांनी आपल्या शाळेत सर्वप्रथम राबविला, त्यांना तो उपक्रम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी उपयोगी ठरला. त्यानंतर जिल्ह्यातील व राज्यातील अनेक शाळांमध्ये हा उपक्रम यशस्वीपणे राबविला जात आहे. याबाबतच्या पुढील यशोगाथा वाचून अधिक माहिती जाणून घेऊया.

## यशोगाथा – १

**नगरपालिका शाळा क्र.६, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर**

**मुख्याध्यापक - श्रीम. कल्पना भाऊसाहेब निंबाळकर**

**सहशिक्षक - श्रीमती सुनिता भाऊसाहेब इंगळे**

अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव हे तालुक्याचे ठिकाण. ऐतिहासिक, अध्यात्मिक पार्श्वभूमी असलेले. माझी शाळा ही शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. शाळेत येणारी सर्व मुले हे झोपडपट्टी भागातील मजूरवर्गीय पालकांची. शिक्षणाशिवाय माणसाला स्वतःचा उद्धार करता येत नाही. शिक्षण प्रक्रियेतील शिक्षक व विद्यार्थी हे महत्त्वाचे अंग आहेत. शिक्षक हा शिक्षण प्रणालीचा कणा तर विद्यार्थी हा आत्मा आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शाळेतून अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. त्यातीलच एक उपक्रम म्हणजे उतारा वाचन उपक्रमातून - विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेचा विकास.

हा उपक्रम राबविण्यासाठी आमच्या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. कल्पना भाऊसाहेब निंबाळकर मॅडम यांनी मला मोलाचे सहकार्य व बहुमोल असे मार्गदर्शन केले. शालेय विकासात मार्गदर्शक तसेच सर्व उपक्रमांसाठी पुढाकार घेणारा व सक्षम परिवर्तनासाठीचा मुख्य घटक म्हणून मुख्याध्यापकांची भूमिका ही महत्वाची असते आणि ही भूमिका मुख्याध्यापिका श्रीम. कल्पना भाऊसाहेब निंबाळकर मॅडम यांनी या उपक्रमाच्या माध्यमातून सार्थपणे पार पडली.

मुलांना पाठ वाचून झाल्यानंतर पाठावरील प्रश्न सोडवणे, परीक्षेत उतारा व त्यावरील प्रश्न सोडवताना अडचणी येत होत्या. एकतर मुले उतारा लक्षपूर्वक वाचत नव्हती. लक्षपूर्वक न वाचल्याने त्यांना प्रश्नांचा नीटसा अर्थ कळत नव्हता. त्यामुळे उत्तरे लिहिताना खूप वेळा मुले पुन्हा प्रश्नच लिहून काढायची किंवा उत्तरे चुकीची लिहिलेली असायची. तसेच उतारा समजपूर्वक वाचत नव्हती. ही बाब लक्षात आल्यानंतर मुलांना सहज आणि सोप्या पद्धतीने उतारावाचनाच्या माध्यमातून विविध प्रश्न प्रकार हाताळता कसे येतील याचा विचार करण्यात आला. त्यातून असे लक्षात आले की यापूर्वी प्रश्नपत्रिकेतील उतारे दीर्घ असल्याने मुले वाचनास कंटाळा करतात ही बाब प्रकर्षाने जाणवली. यावरुन पुढिल नोंदी करण्यात आल्या.

१) मुलांना उतारा नीट कळत नाही.

२) प्रश्नांचा अर्थ मुले नीट समजून घेत नाहीत.

३) उताऱ्यात प्रश्नांची उत्तरे कशी शोधावीत हे मुलांना समजत नाही.

४) प्रश्नप्रकार समजून घेत नाहीत.

५) सृजनात्मक, मुक्तोत्तरी,निंबधवजा प्रश्नांची उत्तरे लिहिताना मुलांना अडचणी येतात.

६) मुले समजपूर्वक वाचन करीत नाहीत.

या सर्व नोंदींच्या दृष्टीने प्रयत्न करुन कमीत कमी ओळींचा उतारा देऊन त्यावर प्रश्न काढण्यात आले. मुलांनी कोणत्या गोष्टींचे समजपूर्वक वाचन करावे यासाठी उतारावाचन हा उपक्रम सुरु केला. मुलांनी पाठ्यपुस्तक किंवा इतर अवांतर गोष्टींचे समजपूर्वक वाचन केले तर ते त्या पाठाच्या आशयाचे सखोल ज्ञानार्जन करु शकतील आणि भाषेचे रसग्रहण करु शकतील.

**उपक्रमाची उद्दिष्टे :-**

१) विद्यार्थ्यांच्या वाचन विकासास प्रेरणा देणे.

२) विद्यार्थ्यांना उता-यावरील प्रश्नांची उत्तरे कशी लिहायची याची माहिती होणे.

३) विद्यार्थ्यांची शालेय स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेणे.

उद्दिष्टे निश्चितीनंतर प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात केली. सुरुवातीला दोन - ओळीपासून उतारा तयार करुन उतारा स्तर वाढवत नेला. त्यात वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, दिर्घोत्तरी, सृजनात्मक, मुक्तोत्तरी, व्याकरणात्मक, स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त अशा प्रश्नांचा समावेश केला. इयत्ता २ री पासून इयत्ता ८ वी पर्यंतचे विद्यार्थी वापरु शकतील अशा पद्धतीने उतारे निवड केली व त्या दृष्टीने प्रयत्न करून कमीत कमी ओळीत उतारा देऊन त्यावर प्रश्न काढण्यात आले.

कोरोनाकालावधीत विद्यार्थ्यांना अभ्यासास प्रवृत्त करण्यासाठी उतारावाचन हा उपक्रम माझ्या शाळेतील मुलांबरोबरच संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी दोन वर्ष राबवलेला होता. तयार केलेल्या पन्नास उताऱ्यांची PDF ऑनलाईन स्वरुपात सर्वांना पाठवली होती. संपूर्ण महाराष्ट्रातून या उपक्रमास उदंड प्रतिसाद मिळाला होता. या अनुभवावरुन पुन्हा नव्याने पालक, शिक्षक, विद्यार्थी, सहकारी शिक्षक यांच्याशी चर्चा केली. व त्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. आणि पुन्हा नव्याने उतारावाचन या उपक्रमास सुरुवात करण्यात आली.

उतारा तयार झाल्यावर तो ऑनलाईनच्या माध्यमातून (what's app) दररोज विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे. त्यामूळे विद्यार्थी वयोगटाला साजेसे उतारे निवडण्यासाठी बालकथेची पुस्तके, इ.पहिली ते आठवीची पुस्तके, इंटरनेटवरील उपयुक्त माहिती, दररोज संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी ऑनलाईन माध्यमांची गरज होती.शाळेतील विद्यार्थ्यांना हाताळण्यास सोपे जावे म्हणून उतारावाचन पीडीएफची छपाई करुन कार्डांना लॅमिनेशन करण्यात आले व मुलांना दररोज एक तास हे कार्ड अभ्यासासाठी देण्यात आले.

१) बौद्धिक क्षमतेनुसार उतारा निवडून त्यावर आधारीत सर्व प्रकारचे कमीत कमी दहा व जास्तीत जास्त पंधरा प्रश्न तयार केले.

२) उतारा व्यवस्थित रुपात विद्यार्थ्यांना ऑनलाईन माध्यमातून रोज पाठवली.प्रिंट काढून तो उतारा शाळेतील विद्यार्थ्यांना सोडवण्यास दिला.

३) विद्यार्थ्यांना यात येणाऱ्या समस्यांचे निराकरण केले.

४) विद्यार्थी संपूर्ण प्रश्न कोणत्याही दडपण विरहित सोडवतील याकडे लक्ष दिले .

५) दिलेल्या उताऱ्याचे वाचन करुन घेतले. प्रश्न-उत्तरे वैयक्तिक व सामूहिक दोन्ही स्वरुपात घेतले जातात.

**उपक्रम कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक ) :-**

हा उपक्रम माझ्या जोडवर्गातील इयत्ता चौथी व सातवीच्या वर्गासाठी पहिल्या टप्प्यात ५० दिवस कालावधीसाठी व दुसऱ्या टप्प्यात ५० दिवस असे एकूण १०० दिवसांसाठी राबविण्यात आला.व यापुढेही हा उपक्रम सातत्याने चालूच आहे .

१) १ फेब्रुवारी ते २३ मार्च २०२३ - दररोज एक याप्रमाणे ५० उतारे.

२) १ जुलै २०२३ ते २० ऑगस्ट २०२३ पुन्हा नव्याने उतारावाचन - आतापर्यंत एकूण १०० उतारे.

https://drive.google.com/file/d/11iI-bTyyWPamAk6zR7fmoYPACxmYvLXW/view


३) दररोज विद्यार्थ्यांना एक उतारावाचन उपलब्ध करुन देण्यात आला .

४) विद्यार्थ्यांना ऑफलाईन प्रिंट देऊन उतारा वाचून घेण्यात आला .

५) विद्यार्थ्यांना आलेल्या शंकाचे निरसन करून , उतारावाचन तपासून दुरुस्ती करण्यात आली .

६) उताऱ्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतली .

७) सदर उत्तरे तपासून दुरुस्ती विद्यार्थ्यांना कळविण्यात आली .




**विद्यार्थी उतारा वाचन व प्रश्नांची उत्तरे सोडविताना**

हा उपक्रम राबविण्यासाठी शाळेतील सहकारी शिक्षक,शिक्षिका,पालक,विद्यार्थी यांचेही सहकार्य लाभले. तसेच महाराष्ट्र भरातून इतर शाळांच्या शिक्षकांनीही 'उतारावाचन' हा उपक्रम त्यांच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवला. इतर

शाळेतील मुलांचाही छान प्रतिसाद मिळत असल्याने आणखी प्रोत्साहन मिळाले. त्यांनाही उतारावाचन उपक्रमातून सराव मिळाला.

उतारा निवडताना विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेनुसार व जास्तीत जास्त चार ते पाच ओळी व कमीत कमी दोन-तीन ओळींचा असल्याने मुलांना वाचताना कंटाळा येत नाही.दोन-तीन वाक्यांच्या ओळीवर पंधरा प्रश्न असल्याने मुलांचा वाचनाचा अधिक सराव झाला. प्रश्नांची उत्तरे शोधताना मुले प्रश्नांचा सर्वांगीण विचार करत होती. एकाच उताऱ्यात विविध प्रकारच्या प्रश्नांचा विचार करण्यात आलेला होता. त्यामूळे मुलांना विविध प्रश्न प्रकार हाताळता आले. प्रश्न प्रकारांची माहिती विद्यार्थ्यांना झाली. विद्यार्थी आवडीने प्रश्नांची उत्तरे लिहू लागली.विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण झाली. विद्यार्थ्यांना पाठाखालील प्रश्न समजण्यास सोपे झाले.प्रत्येक विद्यार्थ्यांपुढे उताराकार्ड असल्याने मुलांचा वर्गात होणारा गोंधळ कमी झाला. व्याकरणात्मक प्रश्नाची उत्तरे शोधताना इतर पुस्तकांचाही आधार मुले घेऊ लागली.


वाचनपूरक साहित्य वाचनाकडे विद्यार्थी कल वाढला.जी मुले जास्तीत जास्त उतारावाचनाची अचूक उत्तरे सोडवतील अशा मुलांना शालेय साहित्य बक्षीस म्हणून देण्यात आले. उतारा व त्यावरील प्रश्न मुले प्रत्यक्ष, व्हाटसअपवर शिक्षकांना पाठवू लागली. महाराष्ट्रातील इतर शाळेतील विद्यार्थ्यांनीही उतारावाचन सोडविल्याचे आवर्जून फोटो पाठवून उपक्रम अतिशय उपयुक्त आहे असे सांगितले. काही शिक्षकांनी शिष्यवृत्ती पूर्वतयारी म्हणूनही उताऱ्यांचा उपयोग केला. विद्यार्थ्यांच्या सोडविलेल्या उतारा व त्यावरील प्रश्नोत्तरे वहीचे फोटो प्रत्यक्ष, व्हाटसअप, फेसबूकच्या माध्यमातून एकत्रित करण्यात आले.



**विद्यार्थी गटात बसून उतारे वाचन करताना.**

**उपक्रमाची फलनिष्पत्ती :-**

हा उपक्रम सुरुवातीला माझ्या जोडवर्गासाठी इ.चौथी व इ. सातवीसाठी चालू केला होता.विद्यार्थी प्रतिसाद चांगला मिळाल्याने व्हाटसअप,फेसबूक माध्यमातून महाराष्ट्रातील इतर शाळापर्यंतही हा उपक्रम पोहचला. इतर शाळांचाही विद्यार्थी प्रतिसाद प्रचंड मिळाला. शिक्षकांनी त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी या उपक्रमाच्या PDF च्या प्रिंट मारुन लॅमिनेशन करुन शिष्यवृत्ती पूर्वतयारी व अभ्यासात मागे पडणाऱ्या मुलांसाठी याचा उपयोग केला.




१) विद्यार्थ्यांचा वाचन विकास होऊन वाचनास गती वाढली.

२)विद्यार्थ्यांना उताऱ्यांच्या माध्यमातून प्रश्नांची उत्तरे कशी शोधावी हे सोप्या पद्धतीने लक्षात आले.

३)विद्यार्थ्यांना उताऱ्यात विविधांगी प्रश्न असल्यामुळे प्रश्नप्रकार कळाले. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयार करण्यास मदत झाली.

४) विद्यार्थ्यांच्या वयाचा विचार करून उतारे निवडल्याने त्यांना वाचताना कंटाळा येत नाही.

५) दोन-तीन वाक्यांच्या ओळीवर पंधरा प्रश्न असल्याने मुलांचा वाचनाचा अधिक सराव झाला.

६) एकाच उताऱ्यात विविध प्रकारच्या प्रश्नांचा विचार करण्यात आलेला होता.त्यामूळे मुलांच्या आकलन क्षमतेचा विकास होण्यास मदत झाली.


७) विद्यार्थी आवडीने प्रश्नांची उत्तरे लिहू लागली. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण झाली.

८) विद्यार्थ्यांना पाठाखालील प्रश्न समजण्यास सोपे झाले.

९) प्रत्येक विद्यार्थ्यांपुढे उताराकार्ड असल्याने मुलांचा वर्गात होणारा गोंधळ कमी झाला.

१०) आकलनात्मक प्रश्नाची उत्तरे शोधताना इतर पुस्तकांचाही आधार मुले घेऊ लागली. वाचनपूरक साहित्य वाचनाकडे विद्यार्थी कल वाढला.


११) महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात हा उपक्रम पोहचला असून विद्यार्थी उतारावाचन सराव करत आहेत.



**विद्यार्थ्यांनी उताऱ्यावर आधारीत प्रश्नांची सोडवलेली उत्तरे.**

विद्यार्थ्यांमध्ये उतारा वाचन उपक्रमात खालीलप्रमाणे संपादणूक दिसून आली. उपक्रम पूर्व व उपक्रमोत्तर स्थिती पुढील तक्ता व आलेखाद्वारे जाणून घेवूया.

| इयत्ता / विद्यार्थी संख्या | उपक्रम पूर्व स्थिती | उपक्रमोत्तर स्थिती |
|---|---|---|
| ४ थी (१५ विद्यार्थी ) | ४०.०० % | ८६.५० % |
| ७ वी (१० विद्यार्थी ) | ५५.०० % | ९५.०० % |




**उतारा वाचन सराव व्हिडिओ लिंक :-** https://www.youtube.com/watch?v=oi7xM0jpHy0

**उपक्रमाची सद्यस्थिती : -**

सदर उपक्रम माझ्या शाळेबरोबरच महाराष्ट्रातील काही  शाळांमध्येही चालू असून प्रचंड प्रतिसाद या उपक्रमास मिळाला आहे. आता या उपक्रमाचे 'आकलनासहीत उतारावाचन' हे पुस्तक श्रीम. सुनिता इंगळे नगरपालिका शाळा क्र. ६ कोपरगाव ता. कोपरगाव यांनी स्वतः तयार झाले आहे. महाराष्ट्रातून या पुस्तकास प्रचंड मागणी आहे.

‘उतारावाचन’ उपक्रमाचा मुले दररोज, नियमित सराव होत असल्याने मुलांना उत्तरे कशी शोधायची हे कळाले. प्रत्येक ओळीवर प्रश्न असल्याने प्रत्येक शब्द मुले काळजीपूर्वक वाचू लागली. यामूळे प्रश्न-उत्तर लेखानात सुधारणा होऊन टापटिपपणा आला. उतारावाचनात सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने उपयुक्त सर्वच प्रश्नांचा यात समावेश असल्याने मुले आनंदाने उतारे सोडवत आहेत.

प्रत्येक दिवशी नवीन उतारा मिळत असल्याने अभ्यासातील तोचतोचपणा जाऊन अध्ययनात रस निर्माण झाला. विद्यार्थ्यांची उतारावाचनामूळे स्पर्धा परीक्षेची नकळत तयारी होऊन ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्य, सृजनात्मक, मुक्तोत्तरी, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, दिर्घोत्तरी प्रश्नांचा सराव होत आहे.

निंबधवजा प्रश्नांचा छान सराव झाला. विद्यार्थी उताऱ्यातून अतिशय जलद गतीने उत्तरे शोधू लागली.उताऱ्यावरील प्रश्न देताना सातत्याने नवनवीन प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे जेणेकरून मुलांचा जास्तीत जास्त सराव होईल.



**विद्यार्थी उताऱ्यावर आधारीत प्रश्नांचा सराव करताना**

मुलांमध्ये सकारात्मक बदल दिसून येत आहे. मुले उतारा नीट वाचून समजावून घेऊ लागली, प्रश्नांचा अर्थ समजावून घेऊन उत्तरे लिहू लागली, उताऱ्यात प्रश्नांची उत्तरे कशी शोधावीत हे मुलांना समजले, विविध प्रश्नप्रकार मुलांना समजले, सृजनात्मक, मुक्तोत्तरी, निंबधवजा प्रश्नांची उत्तरे लिहिताना विचार करुन लिहू लागली, मुले समजपूर्वक वाचन करु लागली,उतारावाचनाची भीती कमी होऊन दडपणविरहित वातावरणात आनंदाने उतारे सोडवून दाखवू लागली. या उपक्रमाचा उपयोग निश्चितच गुणवत्ता वाढीसाठी झाला. मुले स्पर्धा परीक्षेत विचारला जाणारा पहिलाच प्रश्न 'उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा'या प्रश्नांची उत्तरे न चुकता लिहू लागली. मुलांमधील आत्मविश्वास वाढला. प्रश्न-उत्तर लिहिताना व्यवस्थितपणा, टापटिपपणा वाढला. प्रत्येक प्रश्न वाचून सोडविण्याची सवय लागली. वाचन विकासास अधिक गती मिळाली.अवांतर पुस्तके वाचण्याची गोडी वाढली. या उपक्रमाचे शाळेतील विद्यार्थ्यांबरोबर महाराष्ट्रातील इतर शाळेतील विद्यार्थी, पालक, शिक्षकांनीही उत्तम प्रतिसाद दिला यातच या उपक्रमाचे फलित आहे. हा उपक्रम निश्चितच सर्वांनाच उपयोगी पडणारा आहे. या उपक्रमामूळे शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करण्यासही मदतच होणार आहे.

## यशोगाथा २
## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हरीसन ब्रांच, जेऊर कुंभारी, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर
## मुख्याध्यापक – श्रीम. रंजना सुधाकर डोंगरे
## सहशिक्षक - श्री.नवनाथ पांडुरंग सूर्यवंशी

निसगाच्या वनराईनी नटलेली, गोदावरीच्या खळखळत्या कॅनॉलच्या कडेला असणारी, अतिशय निसर्गरम्य वातावरणात वसलेली शाळा म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरीसन ब्रँच, जेऊर कुंभारी, ता.कोपरगाव जि. अहमदनगर होय. पूर्वी हरीसन नावाचा एक इंग्रज पाटकरी अधिकारी होता त्याच्या नावावारुनच शाळेचे नाव हरीसन ब्रँच असे पडले. शाळेतील शंभर टक्के विद्यार्थी हे मजूरवर्गीय पालकांची अत्यंत गरीब घरातील आहे. शाळेत दोन, तीन, चार किलोमीटर अंतरावरून मुले पायी शाळेत चालत येतात. शाळेचा पट 2023 - 24 या शैक्षणिक वर्षात एकूण 33 शाळा द्विशिक्षिकी आहे. शाळेत इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतचे वर्ग आहेत. सर्व मुले या उपक्रमाचा उपयोग करत आहेत.

कोरोना कालावधीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले होते. त्या कालावधीतही विद्यार्थी शाळेच्या प्रवाहात टिकून कशी राहतील यासाठी आम्ही धडपडत होतो. शाळेतील मुलांबरोबर संपूर्ण राज्यातील मुलांसाठी बालसंस्कार समूहाच्या माध्यमातून सुंदर हस्ताक्षर स्पर्धा यशस्वीपणे राबवली होती. ज्यात राज्यातील १०००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. प्रत्येक मूल शाळेच्या प्रवाहात टिकून राहावे म्हणून जे प्रयत्न आवश्यक होते ते सर्व केले होते. मात्र हल्लीच्या मोबाईलच्या जमान्यात वाचनाकडे पूर्णता दुर्लक्ष होत आहे. फक्त लिखाण केले म्हणजे

अभ्यास झाला, अशी मुलांची धारणा होती त्यामुळे या मुलांना वाचनाच्या सवयीकडे वळविणे अत्यंत महत्त्वाचे वाटले. यासाठी काही उद्दिष्ट ठरवली.

१) विद्यार्थ्यांना समजपूर्वक आकलनासह वाचता येणे.

२) शब्दसंपत्तीत वाढ करणे.

३) वाचनकौशल्याचा विकास करणे.

४) प्रश्ननिर्मिती कौशल्य वाढवणे

५) स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेणे.

वरील उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी काय - काय प्रयत्न करता येतील याचा विचार सुरू झाला. मुलांना क्रमिक पुस्तके, गोष्टीची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून दिली. पण मुलांनी वाचलेले त्यांना समजले की नाही हे ही तपासणे अत्यंत महत्त्वाचे होते आणि त्यासाठी मुलांसाठी आकलनासहित उतारे वाचनाचे नमुने मुलांना देणे खूप गरजेचे वाटले. याचा शोध घेत असतानाच मोलाची मदत केली श्रीम. सुनिता इंगळे, सहा. शिक्षिका, नगरपालिका शाळा क्र. ६ कोपरगाव यांच्या 'उतारा वाचन' या उपक्रमाने बाल संस्कार परिपाठ PDF मध्ये आकलनासहीत उतारा वाचन अंतर्गत दररोज वेगवेगळे उतारे देत होतो. त्याखाली प्रश्नोत्तरे,व्याकरणावरील काही प्रश्न होते. अत्यंत सहज सुलभ भाषेत हे उतारे व त्याखाली दिले गेलेले पंधरा प्रश्न अत्यंत उपयुक्त वाटले. उतारा देतानाच अगदी दोन ओळी पासून सात-आठ ओळीपर्यंतचे सोप्याकडून कठिणाकडे असा स्तर असणारे उतारे एकाच ठिकाणी 'आकलनसहीत उतारावाचन' या पीडीएफ मध्ये मिळाले. या उतारा वाचनाच्या PDF चे झेरॉक्स करून मुलांना नियमितपणे हे उतारे वाचनास दिले. वाचनानंतर विद्यार्थी उतारा व त्या खालील प्रश्न सोडवू लागले. या उपक्रमामुळे आमच्या विद्यार्थ्यांना नियमित वाचनाची सवय तर लागली पण विद्यार्थी समजपूर्वक वाचू लागली हा खूप महत्त्वाचा फायदा मुलांसाठी झाला. सुरुवातीला उतारा वाचन अंतर्गत आलेल्या उताऱ्यांचे झेरॉक्स काढून ते मुलांना शाळेत दिले जायचे. कधीकधी दुसरीच्या मुलांसाठी बोर्डवर, चार्टवर उतारे व त्या खालील प्रश्न दिले.

हा उपक्रम राबविण्यासाठी आमच्या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. रंजना सुधाकर डोंगरे मॅडम यांनी बहुमोल असे मार्गदर्शन केले. शालेय उपक्रमात वेळोवेळी त्यांचे मोलाचे असे सहकार्य लाभले. उपक्रमची तयारी, विद्यार्थी सहभाग यामध्ये त्यांची मोलाची साथ मिळाली. शालेय नेतृत्व म्हणून श्रीम. रंजना डोंगरे मॅडम यांनी सर्व उपक्रमांसाठी पुढाकार घेऊन मला नेहमीच मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले आहे.

दररोज दुपारी जेवणानंतर 'एक तास वाचनाचा' या उपक्रमांतर्गत शाळेतील मुलांना उतारा दिला जातो. यात शाळेच्या मुख्याध्यापिका डोंगरे मॅडमची यांची मोलाची मदत झाली. गैरहजर विद्यार्थ्यांसाठी वर्गाच्या व्हाट्सअप ग्रुप वर उतारा पाठवला जातो. दिवाळीच्या सुट्टीतही उतारा वाचन पुस्तकातील उताऱ्यांचे फोटो मुलांच्या वर्गाच्या ग्रुप वर पाठवले जायचे. मुले उताऱ्याचे घरी वाचन करून प्रश्न उत्तरे सोडून वहीचा फोटो पुन्हा वर्गाच्या ग्रुप वर पाठवत असत,अशा पद्धतीने सुट्टीत देखील उतारा वाचन उपक्रम आमच्या शाळेत चालू होता. त्यानंतर शनिवार- रविवार सुट्टीत,सणांच्या सुट्टीत मुलांना घरी वाचण्यासाठी उतारा वाचन हे पुस्तक दिले जायचे. त्यासाठी मुलांचे वस्तीनुसार

गट केले व गटागटाने पुस्तक मुलांपर्यंत पोहोचवले. एखादा विद्यार्थी त्यावेळी घरी नसल्यास किंवा मामा मावशीकडे गेलेला असल्यास संबंधित मुलाचे पालक आपल्या नातेवाईकांच्या मोबाईलवर उतारा चे फोटो पाठवत होते. मुलांना त्या उताराच्या प्रिंट्स झेरॉक्स दिल्या जातात. आपला उतारा सोडून झाल्यास मुले शेजारच्या कडे हे प्रिंट पोहोच करतात. सुट्टीत देखील मुलांना गुंतवून ठेवल्यामुळे, वाचनाची सवय कायम ठेवल्यामुळे पालकांकडून देखील या उपक्रमाचे व पुस्तकाचे स्वागत झाले. आमच्या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे सर्वच वर्ग या उतारा वाचन उपक्रमांमध्ये सहभागी आहेत. उतारा वाचन या उपक्रमामुळे मुलांना वाचनाची तेही समज पूर्वक वाचनाची छान सवय लागली. मुले दररोज आठवणीने उतारा वाचन पुस्तक घेऊन उतारा सोडवतात इतर पुस्तकांमध्ये गोष्टींमध्ये छोटे छोटे उतारे निवडून मुले आता त्यावर आधारित प्रश्न स्वतः तयार करत आहेत. मुलांमध्ये प्रश्न निर्मिती कौशल्याचा ही छान विकास होत आहे.







**विद्यार्थी गटामध्ये बसून उतारे वाचन करताना.**


मुलांना उतारा वाचन उपक्रमाची इतकी सवय झाली आहे की, न चुकता मुले दररोज वेगवेगळ्या उतारा शोधून निवडून, तो वाचून सोडवतात. पुस्तकात एकूण 104 उतारे दिल्याने मुलांचा सरावही जास्तीचा घेता आला. याचा फायदा मुलांना स्पर्धा परीक्षेचे वेळी झाल्याचे मुलांनी व पालकांनी सांगितले. उतारा वाचन पुस्तकातील सर्वच उतारे व त्यावरील प्रश्न मुलांनी सोडवले आहेत. या उताऱ्यातून मुलांना काही इतिहासातील प्रसंग, छोट्या छोट्या गोष्टी, इतर ज्ञानात भर घालणारी अधिकची माहिती मिळत आहे. या उपक्रमामुळे मुलांच्या मनातील वाचनाची अभ्यासाची भीती दूर झाली. मुले आत्मविश्वासाने स्वयंप्रेरणेने वाचन करू लागले आहेत मुलांना सकाळी परिपाठाच्या आधी उतारा फळ्यावर लिहून दिला जायचा. परिपाठ संपल्यानंतर मुले आधी वाचन करून मग त्यावर आधारीत प्रश्न

सोडवायचे त्यानंतर दुपारी जेवणानंतर उतारा देऊन शाळा सुटेपर्यंत जेव्हा वेळ मिळेल तेव्हा मुले उतारा वाचत असत व त्यावर आधारीत  प्रश्न सोडवत असत.  आता प्रिंट स्वरुपात उतारे मिळतात ,मुलांमध्ये उतारा कधी मिळतो याची प्रचंड उत्सुकता असते . एखाद्या दिवशी उतारा देण्यास थोडा उशीर झाला तरी मुले उतारा घेण्यासाठी प्रिंट घेण्यासाठी घाई करतात. उतारा मिळाल्यानंतर कोण सर्वात गतीने अचूक वाचतो आणि कोण सर्वात अगोदर त्यावर आधारीतसर्व प्रश्नांची अचूक उत्तरे सांगतो यासाठी मुलांची स्पर्धा लागते. कोणत्याही वेळी उतारा वाचनाची पुस्तक हातात दिले तरी मुले कंटाळा न करता लगेच सोडवतात. एकंदरीत उपक्रमाला मुलांचा प्रतिसाद अतिशय उत्तम आहे. आता विद्यार्थ्यांना उतारा वाचून उतारावरील प्रश्न सोडवणे या प्रश्नाची भीती वाटत नाही. अगदी सहजतेने कोणताही प्रश्न मुलांना दिला तरी उताऱ्यातून तो प्रश्न ते विचारपूर्वक सोडवतात.

सध्याच्या काळात मोबाईल मुळे सर्वच वयोगटातील मुलांचे, माणसांचे वाचनाचे वेड कमी झाले आहे मोबाईलवर गेम खेळण्याच्या सवयीमुळे मुले वाचनापासून दूर भरकटली गेली आहेत असे शिक्षक म्हणून काळजी वाटते. अशावेळी या मुलांना पुन्हा वाचनाकडे आणणे, त्यांना वाचनाची सवय लावणे, आनंदासाठी वाचणे इत्यादी गोष्टीकडे वळवणे यासाठी उतारा वाचन उपक्रमाची मोलाची साथ मिळाली वाचनाने माणूस समृद्ध होतो म्हणून या भावी पिढीला समृद्ध करण्यासाठी उतारा वाचन उपक्रमाची निश्चितच मदत झाली आहे शिवाय दररोज वेगळा उतारा असल्यामुळे मुलांना शिक्षकांना देखील उत्सुकता असते. उतारा वाचन हा उपक्रम मुलांसाठी अतिशय उपयुक्त असून निश्चितच त्याचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांवर होत आहे.


विद्यार्थ्यांमध्ये उतारा वाचन उपक्रमात खालीलप्रमाणे संपादणूक दिसून आली. उपक्रम पूर्व व उपक्रमोत्तर स्थिती पुढील तक्ता व आलेखाद्वारे जाणून घेवूया.

| **इयत्ता / विद्यार्थी संख्या** | **उपक्रम पूर्व स्थिती** | **उपक्रमोत्तर स्थिती** |
|---|---|---|
| ४ थी (९ विद्यार्थी ) | ४६.०० % | ९२.५० % |



**उतारा वाचन सराव व्हिडिओ लिंक :-** https://www.youtube.com/watch?v=719SSrJqQRc

**फलनिष्पत्ती :-**




१) विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागली.
२) विद्यार्थी आनंदाने उतारा वाचू लागली.
३)विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीमध्ये वाढ झाली
४) स्पर्धा परीक्षांसाठी मुलांना उतारा वाचन हा उपक्रम अतिशय उपयुक्त आहे यातून विद्यार्थ्यांना व्याकरणात्मक प्रश्नही आकलनासहित समजू लागले.
५) वाचनापासून दूर भरकटलेल्या मुलांसाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरला.
६) विद्यार्थी व पालकांमध्ये सकारात्मक वातावरण तयार झाले.
७) विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न निर्मिती कौशल्य वाढीस लागले.
८) शिक्षकांना उतारा वाचन या उपक्रमामूळे प्रश्नाचे मूल्यमापन करण्यास मोलाची मदत झाली.
९) या उपक्रमामुळे मुलांच्या मनातील वाचनाची, अभ्यासाची भीती दूर झाली.
१०) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्वयं प्रेरणा वाढीस लागली.
११) विद्यार्थ्यांना प्रत्येक प्रकारच्या प्रश्न प्रकारांचा सराव झाला.

- **मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी उतारा वाचनातून विद्यार्थ्यांच्या वाचन समृद्धीच्या दृष्टिकोनातून उपयुक्तता-**

  १) पायाभूत साक्षरतेसाठी उतारा वाचन उपक्रमाचा नियमित सराव घेऊन विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेच्या विकासासाठी प्रयत्न करता येईल.

  २) मुलनिहाय तसेच मुलांच्या गटनिहाय उतारा वाचन हा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमता विकसनासाठी उपयुक्त होईल.

  ३) वाचन कोपरा विकसीत करून विद्यार्थ्यांच्या समजपूर्वक वाचनासाठी उतारा वाचन उपक्रमाची मदत होईल.

  ४) उतारा वाचन उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमता व कौशल्यांच्या विकासासाठी हा उपक्रमाची मदत होईल.

  ५) उतारा वाचन उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या संकल्पना दृढीकरणासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल.

- **शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून मोडयूलची उपयुक्तता -**

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची भूमिका शैक्षणिक नेतृत्वाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. यामध्ये प्रामुख्याने शिक्षकांनी शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटक जसे मुख्याध्यापक, सहशिक्षक, विद्यार्थी आणि पालक या सर्वांशी शालेय व्यवस्थापन, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि शैक्षणिक आंतरक्रिया यांच्या संदर्भामध्ये खालील विविध मुद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने सदरील मोडयूल अतिशय उपयुक्त ठरू शकते.

**१) विद्यार्थी विकास :-**

शिक्षकांची भूमिकेमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन करणे, विद्यार्थ्यांनी मिळालेल्या ज्ञानाचे जीवनात उपयोजन कसे करावे, विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेचा विकास, भाषिक कौशल्यांचा विकास याचबरोबर विद्यार्थ्यांच्या नेतृत्व कौशल्याच्या विकासासाठी सदर उपक्रम मार्गदर्शक ठरणार आहे.

१ **विद्यार्थी विकास**

२ **शालेय व्यवस्थापन**

३ **शालेय आंतरक्रिया**

४ **प्रत्यक्ष अध्ययन अनुभव**

५ **सहशालेय उपक्रम आयोजन**

**२) शालेय व्यवस्थापन :-**

शाळेतील दैनंदिन कामकाज करताना विद्यार्थ्यांच्या आनंददायी शिक्षणात शालेय नेतृत्वाची महत्त्वाची भूमिका असते. शाळेमध्ये अध्ययन-अध्यापन ते सहशालेय उपक्रम या सर्वांचे व्यवस्थापन करणे हे शालेय नेतृत्वाचे काम असते. या दृष्टीने उतारा वाचन उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेचा विकास उपक्रमाचे व्यवस्थापन असे करावे हे या लक्षात येते.

**३) शालेय आंतरक्रिया :-**

शालेय कामकाजामध्ये मानवी घटकातील आंतरक्रिया नित्याचाच भाग आहे. विविध उपक्रमामध्ये सुयोग्य मानवी आंतरक्रिया होण्यासाठीची माहिती या उपक्रमाच्या माध्यमातून मिळते.

**४) प्रत्यक्ष अध्ययन अनुभव :-**

शिक्षकांना वर्ग अध्यापन करताना मुलांना प्रत्यक्ष अनुभव दिल्याने मुलांच्या संकल्पना स्पष्ट होतात. तसेच मुलांचे शंका समाधान प्रत्यक्ष अनुभवातून करता येते. यासाठी सदर उपक्रमाची मदत होणार आहे.

**५) सहशालेय उपक्रम आयोजन :-**

शाळेतील प्रभावी शैक्षणिक कार्यक्रमाच्या विकास आणि अंमलबजावणीचे नेतृत्व करण्याच्या दृष्टीने विविध  शालेय उपक्रमामध्ये आयोजन कशाप्रकारे करावे यासाठी हा उपक्रम मार्गदर्शक ठरणार आहे.

**सद्यस्थितीत  महाराष्ट्रात सुरू असलेले वाचन विषयक उपक्रम**

१) महाराष्ट्रातील वाचन चळवळ उपक्रम शासन निर्णय 22 नोव्हेंबर 2023
२) निपुण भारत अभियान अंतर्गत शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये वाचन अभिरुची व वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी यासाठी आठवड्याचा प्रत्येक शनिवार वाचन दिवस उपक्रम
३) मुख्यमंत्री माझी शाळा अंतर्गत विविध वाचन विषयक उपक्रम
४) वाचन प्रेरणा दिनानिमित्त श्रेय स्तरावर विविध वाचनविषयक कार्यक्रमांचे आयोजन
५) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांचे मार्फत 100 दिवस वाचन अभियान

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये नमूद केल्या प्रमाणे विद्यार्थ्यांची समजपूर्वक वाचन क्षमता विकसित होण्यासाठी महाराष्ट्रात प्रयत्न सुरु आहेत, या प्रयत्नांसोबतच मुख्याध्यापकांनी व शिक्षकांनी या मोड्यूलचा उपयोग विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित करण्यासाठी केल्यास निश्चितच त्याचा फायदा विद्यार्थी विकासास होईल.

**संदर्भ साहित्य :-**

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०.
२) शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम (SLDP) पूरक वाचन साहित्य, जानेवारी २०१८, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद.
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन. शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण 2021/ प्र.क्र.179/ एसडी-6 मुंबई- 400 032, दिनांक : 27 ऑक्टोबर, 2021.

४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन. शासन निर्णय क्रमांकः शैगुवि.2015/ (80/15) एसडी-6 मुंबई- 400 032, दिनांक : 22 जून, 2015.
५) पायाभूत भाषा साक्षरता, शिक्षक मार्गदर्शिका ( प्रथम भाषा मराठी ), राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
६) आकलानासह उतारा वाचन, श्रीम.सुनिता इंगळे (सूर्यवंशी ) गुरुमाऊली प्रकाशन लातूर.
७) SARTHAQ Part 1, NEP IMPELTENTION PLAN, (2021) Department of School Education and Literacy Ministry Of Education, Government of INDIA.

**मोड्यूल विकसक**
डॉ.गणेश साहेबराव मोरे
**अधिव्याख्याता**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
अहमदनगर

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
**समन्वयक**
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),
छत्रपती संभाजीनगर

**मार्गदर्शक**
डॉ.वैशाली जामदार
**संचालक**
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),
छत्रपती संभाजीनगर